# संत साहित्य आणि दलित साहित्य

**डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे**
**मराठी विभाग**
**न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर.**
**Email : yelwandelaxmikant@gmail.com**
**मोबा. ९८२२८६८३२७**

संतसाहित्य आणि दलित साहित्य यांच्यातील अनुबंधाचा विचार करताना दोन्हीचा कालखंड लक्षात घेणे गरजेचे आहे. प्रत्येक काळाचा एक विशिष्ट युगधर्म असतो त्यामुळे त्या त्या काळच्या वातावरणात घडणाऱ्या कला व साहित्याचे संदर्भही एकसारखे असत नाहीत. हा महत्त्वाचा भाग डोळयासमोर ठेवून दोन्ही साहित्यांच्या प्रेरणा, वेगळेपणा आणि साम्यस्थळांसंदर्भात काही भूमिका मांडण्याचा प्रयत्न सदर शोधनिबंधातून केला आहे.

**तत्कालीन युगधर्म आणि प्रेरणा**

संत साहित्याचा विचार केल्यास मध्ययुगात अतिशय जोरकसपणे संत साहित्याची चळवळ निर्माण झाली. ज्या काळात संताच्या समोर संस्कृतीत वैदिक वाङ्मयाखेरीज कोणतीच गोष्ट नव्हती. वर्णव्यवस्था, जातिभेद, विषमतावादी मनोवृत्तीने पोखरलेला समाज असे चित्र पहावयास मिळत होते. अशावेळी अध्यात्मिक तत्त्वज्ञान लोकांसमोर आणण्यासाठी ज्ञानेश्वरांपासून ते तुकारामांपर्यंत होऊन गेलेल्या संतांनी मोठे प्रयत्न केले. प्रामुख्याने सर्वसामान्याच्या बोलीतून आपले तत्त्वज्ञान संतांनी मांडले. संताचे तत्कालीन कार्य हे त्या काळाच्या संदर्भात विचारात घेतल्यास निश्चितच महत्त्वाचे होते हे नाकारता येणार नाही. वर्णव्यवस्था, स्त्री व शुद्रांना नसलेले अधिकार आणि एकुणच हीन यातीत जन्माला आलो म्हणून वाटणारी खंत चोखोबांच्या अभंगातून ठिकठिकाणी व्यक्त झाली आहे. ''अध्यात्माच्या प्रांतात ज्ञानेश्वरांनी लोकशाही निर्माण केली याचा अर्थ सर्व जातीजमातींच्या राहुटया आपापल्या विटाळाच्या, आचारधर्माच्या कल्पना न सोडता एकाच विठ्ठलाची भक्ती करू शकत.''[१] अठरापगड जातीतील संत एका छत्राखाली येणे ही बाब दुर्लक्षित करण्याजोगी निश्चितच नाही. सर्वांनाच मोक्षप्राप्ती करता येऊ शकते तो अधिकार सर्वांना आहे अशी शिकवण वारकरी सांप्रदायाने दिली. तरीही याच काळात महानुभाव सांप्रदायातील आचार्यांनी घेतलेल्या भूमिके इतक्या कठोरपणे आपले मत ज्ञानेश्वर वा प्रभावळीतील संत मांडताना दिसत नाहीत. किंबहुना त्यामुळे त्यांचे कार्य कनिष्ठ ठरते असे म्हणता येणार नाही. तत्कालीन परिस्थितीचा विचार करणेही या दृष्टीने महत्त्वाचे आहे. तरीही संताच्या एकूण लेखनाकडे पाहिले तर समता प्रस्थापित करणे, जातिभेदाचे उच्चाटन करणे ही प्रमुख प्रेरणा त्यांच्या लेखनाची नव्हती तर भक्तीच्या माध्यमातून मोक्षप्राप्ती व्हावी हाच धागा संतसाहित्यामागे दिसतो.

दलित साहित्याचा विचार केल्यास १९६० नंतरचा महत्त्वाचा प्रवाह म्हणून दलित साहित्याच्या चळवळीकडे पहावे लागते. दलित साहित्याची पार्श्वभूमी विचारात घेतली तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची मुख्य प्रेरणा मानून या प्रवाहाची वाटचाल सुरू झाली. त्या पूर्वी म.फुले, छ.शाहू, महर्षी शिंदे यांच्या भूमिकांचे पाठबळ दलित साहित्याला उपयुक्त ठरले हे लक्षात घ्यावे लागते. त्याबरोबरच १९ व्या शतकात अवतरलेल्या प्रबोधन पर्वामुळे एकूणच समाजव्यवस्थेत आमुलाग्र बदल घडलेले दिसतात. केवळ अध्यात्म अथवा मोक्षाच्या कल्पना गळून पडून बुध्दिप्रामाण्यवादी व विज्ञाननिष्ठा यांची जाणीव समाजात निर्माण होत होती. अगदी परिपूर्णतेने या बाबी स्विकारल्या नसल्या तरी शिक्षणाच्या माध्यमातून हे सर्व संदर्भ लोकांसमोर खुले होत होते.

यांत्रिकीकरणाला चालना मिळत होती व पूर्वपरंपरांपेक्षा सुधारणावादी दृष्टिकोण समाजात निर्माण होत होता. या सर्व बाबी एकीकडे घडत असताना दुसरीकडे दारिद्रय आणि जातिव्यवस्थेने दलित हतबल झाले होते. या पार्श्वभूमीवर आपल्याला नाकारणाऱ्या परंपरांना नकार, विद्रोहाची भूमिका डॉ. आंबेडकरांनी मांडली आणि ती दलित चळवळ आणि साहित्यास प्रेरणास्त्रोत ठरली. या काळात ''दलित तरूणांनी प्रस्थापित विषम समाजरचनेविरूध्द असलेली आपल्या मनातील 'चीड' आणि 'संताप' आपल्या लेखनातून व्यक्त केला. या साहित्यालाच दलित साहित्य असे संबोधन्यात आले.''[२] या साहित्याचा विचार केल्यास समता प्रस्थापित करणे, जातिभेदाचे उच्चाटन करणे आणि माणसाला माणूस म्हणून जगता यावे ही प्रमुख प्रेरणा दलित साहित्याची होती.

म्हणजे संत साहित्य आणि दलित साहित्य यांचा कालखंड वेगळा असल्याने त्यांच्यातून प्रकटणारी तत्त्वे सारखीच होती हे मान्य करणे शक्य होणार नाही. संताची भूमिका मानवतावादाची असली तरी त्यांनी निर्माण केलेल्या साहित्यातून प्रत्यक्षपणे व परखडपणे समतेचा पुरस्कार केलेला दिसत नाही. अगदी ज्या चोखोबांना याचे चटके सहन करावे लागले ते देखील उघडपणे बोलू शकले आहेत असे दिसत नाही. आपण हीन यातीत जन्माला आलो याचे दु:ख मांडताना 'हीन याती केली देवा कैसी घडो तुमची सेवा' असे उदगार ते काढतात. मात्र हे नाकारण्याचे साहस ते करत नाहीत वा त्यांना ते करता येत नाही. या उलट ''बाबासाहेबांनी अस्पृश्यांची कैफियत गावकुसापासून ते गोलमेज परिषदांपर्यंत मांडली. अस्पृश्यांच्या समान हक्कासाठी पाण्यापासून ते परमेश्वरापर्यंत संघर्ष केला. बाबासाहेबांच्या या कार्यामुळे संपूर्ण दलित समाज प्रभावित झाला.''[३] दोन्ही कालखंडातील या घटना लक्षात घेतल्या तर संतांनी मोठया प्रमाणावर अध्यात्म, मोक्ष व मुक्तीसाठी भक्ती आरंभली होती. तर आंबेडकरांचा मंदिरप्रवेश मृत्यूनंतरच्या मोक्षासाठी नसून उच्चनिचता, अस्पृश्यता, विषमता यामुळे जिवंतपणीच जो भोगवटा अस्पृश्यांना सोसावा लागत होता. त्यांना न्याय मिळावा, समानता मिळावी यासाठी त्यांनी मंदिर प्रवेशासाठीचे सत्याग्रह सुरू केले. म्हणजे नीती नाकारणाऱ्या विरांधात विद्रोह हेच आंबेडकरी विचारांचे सूत्र दलित साहित्यात दिसते.

**संत साहित्य व दलित साहित्यातील भूमिका**

१. संत साहित्य व दलित साहित्याचा विचार करताना त्यांनी केलेला भाषेचा वापर पाहिला तर दोन्ही साहित्यातून सर्वसामान्यांच्या बोलीला प्राधान्य दिले आहे. संस्कृतीतील तत्त्वज्ञान लोकभाषेतून लोकांपर्यंत पोहोचावे या दृष्टीने सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनातील अनेक संदर्भ अभंगातून, ओव्यातून, भारूडातून संतानी मांडले. शेतीभाती, दळणकांडण, व्यवसायातील शब्द संकल्पना संत साहित्यात मोठया प्रमाणावर दिसतात. तर दलित साहित्यातून आपले दु:ख, भोगवटा उभा करताना आपल्या जगण्याचे संदर्भ मांडताना बोलीभाषेला प्राधान्य दिलेले दिसते.

२. संतसाहित्यातून परमार्थाची भूमिका मांडली असली तरी त्याच्या जोडीने समाजजागृती, कर्मकांडांना विरोध, मानवतावादाची पेरणी संताना अपेक्षित आहे. त्या दृष्टीने तत्कालीन समाजात असलेल्या अंधश्रध्दांचा निषेध संतसाहित्यातून पहावयास मिळतो. दलित साहित्याचा विचार केल्यास त्यातून परंपरांना नाकारण्याची भूमिका मांडलेली आहे. त्यामुळे आपोआपच परंपरेतील दैवाधीनता, अंधश्रध्दा, कर्मकांड यांना मूठमाती देण्याची भाषा या साहित्यातून अधोरेखित होते.

३. संतसाहित्यातून अध्यात्मिकतेच्या संदर्भासोबत नैतिकतेचे निवेदन आढळते. समाजाला नीतीबोध सांगताना तो पाप—पुण्याच्या आधाराने संतानी मांडला आहे. तद दलित साहित्याचा मूळ आधार नैतिकता हाच

आहे. आपण जे मांडतो आहोत ते मानवतेच्या दृष्टीने योग्य असून आपल्याकडे समाजाचे हजारो वर्षे झालेले दुर्लक्ष यापुढे सहन करणार नाही ही जाणीव या साहित्यातून प्रकटते. नैतिकतेबरोबरच केवळ निवेदनातून समाज बदलणार नाही तर आपल्या हक्कासाठी आग्रही असले पाहिजे ही बाब दलित साहित्य महत्त्वपूर्ण मानते. शिवाय हक्काची जाणीव सर्वांना असली पाहिजे याचाही सूर दलित साहित्यातून प्रबळपणे पुढे आला म्हणूनच साठोत्तरी प्रवाहातील अनेकांना बळ देण्याचे कार्य दलित साहित्यामुळे मिळाले.

४. संतसाहित्य हे दैववादाला नाकारत नाही त्यामुळे जे काही घडले आहे ते त्याच्यामुळेच अशी भूमिका संताच्या अभंगातूनही व्यक्त होते. त्यामुळे जे मिळाले त्यात समाधान मानले पाहिजे अशी भूमिका संतसाहित्यात दिसते. या उलट आपल्या जगण्याच्या वाटा आपल्यालाच शोधाव्या लागतील. आपण शांत राहिलो, आपल्या हक्कासाठी झगडलो नाही तर या व्यवस्थेत आपल्याला काहीच मिळणार नाही, ही जाणीव दलित साहित्यातून व्यक्त होते. त्यामुळे संघर्षाची भूमिका दलित साहित्यातून व्यक्त होताना दिसते.

एकुणच संतसाहित्य आणि दलित साहित्याचा विचार करता दोन्हींचे कालखंड वेगळे आहेत, त्या त्या काळातील प्रश्नही वेगवेगळे आहेत आणि त्यांच्या निर्मितीच्या प्रेरणाही वेगळया आहेत. समोर शिक्षण, ज्ञान व प्रबोधनाचे फारसे संदर्भ उपलब्ध नसताना सर्वसामान्यांसाठी, समाजजागृतीसाठी मानवतावादी दृष्टीने संतानी केलेले कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याचा दलित साहित्यावर प्रभाव, परिणाम झाला आहे असेही म्हणता येणार नाही. वरील मुद्द्यांचा विचार केल्यास काही समानता त्यातून अधोरेखित झाली तरी उत्कृष्ट साहित्य हे वास्तवाचा वेध घेते या न्यायाने ती दोन्हींमध्ये आलेली आहे.

''संत साहित्य म्हणजे परमार्थिक लोकशाहीची चळवळ व तिच्याशी एकात्म असलेले साहित्य हा महाराष्ट्राच्या इतिहासातील एक तेजस्वी सर्ग होय. या सर्गाचाच नवा अवतार नव्या संदर्भात दलित चळवळीच्या रूपाने पुढे आला आहे.''[४] ही प्रा.रा.ग.जाधव यांची भूमिका दोन्ही चळवळींचे व त्यातून निर्माण झालेल्या साहित्याचे मोठेपण मांडणारी आहे. त्याबरोबरच स्वत:ची साहित्यमूल्ये निर्माण करणे, परंपरेचे वळण स्वत:शी अनुकूल करणे, माणसाच्या चांगुलपणावर श्रध्दा ठेवून निर्मिती करीत राहणे या संतसाहित्यातील भूमिकेतून दलित साहित्य मोठी झेप घेऊ शकते ही त्यांची अपेक्षा भविष्यात दलित साहित्यातून निश्चितच अधोरेखित होईल आणि संत साहित्याची परंपरा जशी शतकानुशतके लोकांच्या मनात घर करून राहिली आहे तसेच दलित साहित्यही पुढील हजारो वर्षे जनसामान्यांना प्रेरणा देत राहील असा विश्वास वाटतो.

**संदर्भ :**

१. भगत दत्ता : दलित साहित्य दिशा आणि दिशांतर, अभय प्रकाशन, नांदेड, आवृत्ती पहिली १९९२, पृ. १८
२. लिंबाळे शरणकुमार (संपा.) : शतकातील दलित विचार, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि. पुणे, दुसरी आवृत्ती २००७, पृ.३५
३. तत्रैव, पृ.३४
४. जाधव रा.ग. : निळी पहाट, प्राज्ञ पाठशाळा मंडळ, वाई, आवृत्ती पहिली १९७८, पृ.७०